# मृत्युपत्रासंबंधी  वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs)

मृत्युपत्र म्हणजे एखाद्या व्यक्तीने,   तिच्या मृत्यूनंतर तिच्या  स्वकष्टर्जित  मालमत्तेचे काय करावे किंवा तिची विल्हेवाट कशी लावावी, या तिच्या हेतूची आणि इच्छेची केलेली कायदेशीर घोषणा होय. जर एखाद्या व्यक्तीने आपले मृत्युपत्र तयार केले नसेल, तर तिची मालमत्ता  त्या व्यक्तीच्या पश्चात संबंधित वारसा कायद्यांनुसार हस्तांतरित  होते.

## मृत्युपत्रासंदर्भात काही सामान्य व वारंवार  विचारले जाणारे प्रश्न  व त्याची उत्तरे खाली दिली आहेत .

**प्रश्न १:** मृत्युपत्र कोण तयार करू शकते?

**उत्तर:** १८ वर्षापेक्षा  जास्त वय असलेली आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असलेली कोणतीही व्यक्ती आपले मृत्युपत्र तयार करू शकते.

**प्रश्न २:** एकदा मृत्युपत्र तयार केले की ते कायमचे अंतिम असते का?

**उत्तर:** नाही. मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या हयातीत ते कधीही बदलले जाऊ शकते किंवा रद्द केले जाऊ शकते (जरी मृत्युपत्राची नोंदणी झालेली असेल, तरीही त्यात बदल करता येतो).

**प्रश्न ३:** एखाद्या व्यक्तीचे मृत्युपत्र न करताच निधन झाले, तर तिची सर्व मालमत्ता आपोआप जोडीदाराला (पती/पत्नी) मिळते का?

**उत्तर:** नाही. एखाद्या व्यक्तीचे मृत्युपत्र न करता निधन झाले, तर तिचे कायदेशीर वारसदार आपापल्या संबंधित वारसा कायद्यानुसार मालमत्तेवर दावा करू शकतात.

**प्रश्न ४:** मृत्युपत्र फक्त इंग्रजी भाषेतच लिहिणे बंधनकारक आहे का?

उत्तर: नाही. मृत्युपत्र कोणत्याही भाषेत तयार केले जाऊ शकते, फक्त ते मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीला समजणाऱ्या भाषेत असावे.

**प्रश्न ५:** मृत्युपत्राची नोंदणी करणे आवश्यक आहे का?

**उत्तर:** नाही. मृत्युपत्राची कायदेशीर नोंदणी करणे बंधनकारक नाही. तथापि , भविष्यातील वाद टाळण्यासाठी मृत्युपत्राची नोंदणी करून घेणे नेहमीच फायदेशीर व योग्य ठरते.

**प्रश्न ६: मृत्युपत्रासाठी साक्षीदारांची (Witnesses) गरजअसते का?**

**उत्तर:** होय. प्रत्येक मृत्युपत्रावर किमान दोन साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे.

**प्रश्न ७: मृत्युपत्र स्टॅम्प पेपरवर छापणे आवश्यक आहे का?**

**उत्तर:** गरज नाही. मृत्युपत्र एका साध्या कागदावरदेखील तयार केले जाऊ शकते.

**प्रश्न ८: मृत्युपत्रावर स्टॅम्प ड्युटी भरावी लागते का?**

**उत्तर:** नाही, मृत्युपत्रावर कोणतीही स्टॅम्प ड्युटी भरावी लागत नाही.

**प्रश्न ९: जर एखादी व्यक्ती सही करू शकतनसेल, तरी ती मृत्युपत्र करू शकते का?**

**उत्तर:** होय, ती व्यक्ती मृत्युपत्रावर आपल्या अंगठ्याचा ठसा उमटवू शकते. (परंतु, त्यावर अशी नोंद असावी की मृत्युपत्रातील सवव मजकूर त्या व्यक्तीला नीट समजवून सांगण्यात आला आहे आणि तो त्या व्यक्तीने पूर्णपणे समजून घेतला आहे).

**प्रश्न १०: मृत्युपत्र करताना डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडणे बंधनकारकआहे का?**

**उत्तर:** नाही, कायद्यानुसार डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक नाही परंतु, भविष्यात मृत्युपत्राला कोणतेही कायदेशीर आव्हान देता येऊ नये म्हणून डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडणे अधिक सुरक्षित ठरते .

**प्रश्न ११: जर एखाद्या व्यक्तीने मृत्युपत्र केले नाही, तर तिच्या मालमत्तेचे वाटप कसे केले जाते?**

**उत्तर:** भारतामध्ये विविध धर्मीयांसाठी वेगवेगळा वारसा हक्क कायदा आहे:

हिंदू , शीख, बौद्ध आणि जैन धर्मीयांसाठी : हिंदू वारसा कायदा, १९५६ (Hindu Succession Act, 1956) लागू होतो.

मुस्लिम धर्मीयांसाठी : मुस्लिम पर्सनल लॉ (Muslim Personal Law) लागू होतो.

ख्रिश्चन , पारशी, ज्यू आणि वरील सूचीमध्ये नसलेल्या इतर सर्व धर्मीयांसाठी: भारतीय वारसा कायदा, १९२५ (Indian Succession Act, 1925) लागू होतो**.**

***अस्वीकरण:***

*या दस्तऐवजामध्ये समाविष्ट असलेली माहिती केवळ सामान्य मार्गदर्शनासाठी आहे. ही माहिती नमूद केलेल्या दिनांकापर्यंतच्या प्रचलित कायदे, नियम आणि नियमांच्या आमच्या आमच्या विश्लेषणावर आधारित आहे. याचा वापर विशिष्ट कायदेशीर सल्ल्याचा पर्याय म्हणून केला जाऊ नये. सामान्य जनतेच्या सुलभ संदर्भासाठी ही माहिती अत्यतं सुटसुटीत करून सांगण्यात आली आहे, ज्यामुळे मूळ कायदेशीर अर्थापेक्षा वेगळा अर्थ निघू शकतो. म्हणूनच, आम्ही शिफारस करतो की कोणत्याही विशिष्ट विषयावर , गुंतवणूक किंवा आर्थिक बांधिलकी स्वीकारण्यापूर्वी तज्ज्ञ कायदेशीर सल्लागाराचा सल्ला नक्की घ्यावा.*